**निशाणी क्रमांक – २९**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नाव – सखाराम शेषेराव देवकत्ते,

वय – ५० वर्षे धंदा – शेती,

रा. जांब, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एन. ए. भांगे**

**०१.** मी आरोपींना ओळखतो. दिनांक १२.०१.२०२४ रोजी पोलीसांनी मला जांब येथे पानंद रस्ता येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्यावेळी माझ्यासोबत दुसरे पंच रावसाहेब व पोलीस हे आमच्यासोबत होते. घटनास्थळ फिर्यादी यांनी दाखवले होते. पोलीसांनी माझ्यासमोर पंचनामा केला व मला सही करण्यास सांगितले. मी त्यावर सही केली. आता मला घटनास्थळ पंचनामा **निशाणी क्र.२८** दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. बी. व्ही. कुमदाळे**

**०२.** सखाराम केशवराव देवकत्ते मी नाही. मी पंचनामा करणाऱ्या पोलीसांना माझे नाव सखाराम शेषेराव देवकत्ते सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहीता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनास्थळाच्या चतुःसिमा

सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी माझ्या भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अहमदपूर ते जांब एसटीने जाण्यास अर्धा ते पाऊन तास लागतो. अहमदपूर ते जांब ९ किलोमीटर अंतर आहे. घटना दिनांक ०१.१२.२०२४ रोजी घडली होती व त्याच्या दुसऱ्यादिवशी पोलीस पंचनाम्यासाठी आल्याची शक्यता आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी भावकीतील असल्याने मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**फेरतपास** काही नाही.

श्रुवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.07.19 16:10:08 +0530

**(श्रीमती स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –१८.०७.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.

न्या.द.प्र.वर्ग.

**निशाणी क्रमांक – २७**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२</u>**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नाव – रावसाहेब विश्वनाथ देवकत्ते,

वय – ३७ वर्षे धंदा – शेती,

रा. जांब, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एन. ए. भांगे</u>**

**०१.** मी आरोपींना ओळखतो. दिनांक १२.०१.२०२४ रोजी पोलीसांनी मला जांब येथे पानंद रस्ता येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्यावेळी माझ्यासोबत दुसरे पंच सखाराम देवकत्ते हे होते. घटनास्थळ फिर्यादी यांनी दाखवले होते. घटनास्थळाच्या उत्तरेला हाडोळती रस्ता आहे, दक्षिणेकडे मारूती मंदीर आहे, पुर्वेला खंडु देवकत्ते यांची शेती व पश्चिमेस वसंत होनराव यांची शेती आहे. पोलीसांनी माझ्यासमोर पंचनामा केला व मला सही करण्यास सांगितले. मी त्यावर सही केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२८** देण्यात येतो.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. बी. व्ही. कुमदाळे</u>**

**०२.** पंचनामा सकाळी ९.३० ते ११.०० च्या दरम्यान झाला. पंचनाम्यासाठी आम्हाला एका पोलीस साहेबांनी बोलवले होते त्यांचे नाव मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी माझ्या भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, रावसाहेब देवकत्ते माझ्या भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी, फिर्यादी व रावसाहेब आम्ही एकत्र आलो आहोत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहेकी, अहमदपूर येथुन जांब येथे जाण्यास

एसटीने अर्धा ते पाऊन तास लागतो. हे म्हणणे खरे आहे की, ऑटोने जाण्यास ही पाऊन ते एक तास लागतो. घटनेच्या आधी एक दिवस फिर्यादीने आरोपीला मारहाण केल्याचे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला मदत होण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**फेरतपास** काही नाही.

श्रृवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.07.19 16:10:13 +0530

**(श्रीमती स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –१८.०७.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.

**निशाणी क्रमांक – २५.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव – मारोती व्यंकटराव देवकत्ते,
वय – ४७ वर्षे धंदा – शेती,
रा. जांब, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एन. ए. भांगे**

**०१.** मी आरोनींना ओळखतो. तिन आरोपी आमच्या गावातील आहेत तर एक आरोपी आमच्या गावाजवळील सावरगाव थोट या गावचा आहे. दिनांक १०.०१.२०२४ रोजी मी जनावरे घेऊन शेताकडे जात होतो. आरोपी क्र.१ ते ३ यांनी मला शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. दिनांक ११.०१.२०२४ रोजी आरोपी क्र.१ ते ४ यांनी मला मारहाण केली. त्यांनी काठी व दगडाने माझे डोके फोडले. 'तु शेताजवळुन ये जिवंत सोडणार नाही' अशी धमकी दिली. आमच्या शेताला तिथुनच रस्ता आहे. मारल्यानंतर मी दवाखान्यात आलो. दवाखान्यात उपचार घेवून मी पुन्हा पोलीस स्टेशनला गेलो व तक्रार दिली. आता मला मी दिलेली तक्रार दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२६** देण्यात येते.

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. बी. व्ही. कुमदाळे**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०१.२०२४ रोजी माझ्याविरूध्द अहमदपूर पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं.१९/२०२४ नोंदवलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या केसचा क्र.३२६/२०२४ असून त्यात मी जामीन घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या केसमध्ये मी, माझी पत्नी, तिन मुले व इतर आरोपी आहोत. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ११.०१.२०२४ रोजी वेळाअमावश्या होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०.०१.२०२४ रोजी सायंकाळी ७.०० वाजता माझे आरोपी क्र.१ सोबत शेतात भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी माझा मुलगा शिवकुमार याने आरोपी क्र.१ च्या डोक्यात कत्तीचा घाव घातला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी व ओमकार देवकत्ते मिळुन आरोपी क्र.१ च्या डोक्यात दगड घातला होता.

हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ची पत्नी व मुलगा भांडण सोडवायला आले असता माझा मुलगा व पत्नी यांनी त्यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०१.२०२४ च्या रोजीच्या घटनेनंतर आरोपी क्र.१ यास लातूर येथे शासकिय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी पाठवण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.०१.२०२४ रोजी आरोपी क्र.१ चा सि.टी स्कॅन झाला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी त्याच्या घरातील एकटा कर्ता पुरुष आहे.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २७.०४.२०२३ रोजी शेताच्या रस्त्यावरून आरोपी क्र.२ ने माझ्याविरूध्द एन.सी दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, ती केस मी आरोपींचा धुरा मोडल्यामुळे केली होती.

**०४.** माझ्याकडे जे.सी.बी. व मोटारसायकल ही वाहने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझा वाळूचा धंदा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने दिनांक १०.०१.२०२४ रोजी माझ्यावर दाखल केलेल्या गुन्ह्याला शह देण्यासाठी दुसऱ्यादिवशी मी त्याच्याविरूध्द खोटा गुन्हा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०१.२०२४ रोजी आम्ही आरोपीला मारले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपींविरूध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**फेरतपास** काही नाही.

श्रृवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.07.19 16:08:22 +0530

**(श्रीमती स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –१८.०७.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.

न्या.द.प्र.वर्ग.